सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

महाराष्ट्र शासन
गृह विभाग

दुरध्वनी क्र. ०२२-२५२२९३०३
Email ID-dcpzone6-mum@mahapolice.gov.in
zone6stat@gmail.com

पोलीस उप आयुक्त, पुर्व परिमंडळ - ६ यांचे कार्यालय,
नवीन प्रशासकीय इमारत ४ था माळा , आर.सी. मार्ग, चेंबुर, मुंबई-४०००७१

---

# प्रेस नोट

( दि.१५/०९/२०२६)
(शिवाजीनगर पोलीस ठाणे)

## १९ वर्षांपासून फरार असलेल्या जाहीरनाम्यातील आरोपीस शिवाजीनगर पोलिसांनी केली अटक

शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे दाखल असलेल्या गु.र.न.२१२५/२००७ कलम ५० महाराष्ट्र जमीन महसूल संहिता अन्वये दाखल गुन्ह्याची न्यायालयीन कार्यवाही सुरु असतांना आरोपी नामे मोतीलाल फुलेना चौरसिया हा मा.न्यायालयात न्यायालयीन कार्यवाही दरम्यान हजर राहत नव्हता, तो मागील १९ वर्षांपासून फरार होता, त्यामुळे मा.न्यायालयाने सदर आरोपीस हजर होणे करीता प्रथम अटक वॉरंट काढले, त्यानंतरही आरोपी न्यायालयीन कार्यवाहीस हजर न राहिल्याने मा. अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी न्यायालय, कुर्ला, ५७ वे न्यायालय यांनी दिनांक १४/०८/२०२६ रोजी आरोपीविरुध्द जाहीरनामा (Proclamation) जारी केला होता.

सदर आरोपीचा शोध घेण्यासाठी शिवाजीनगर पोलीसांकडुन सातत्याने प्रयत्न करण्यात येत होते, सदर गुन्ह्यातील आरोपी मोतीलाल फुलेना चौरसिया हा दीर्घकाळापासून पोलिसांना गुंगारा देत फरार होता . सदर आरोपी हा मानखुर्द, मुंबई या परिसरात येणार असल्याची विश्वसनीय गुप्त माहिती शिवाजीनगर पोलिसांना प्राप्त झालीत .त्यानुसार पोलिसांनी सदर ठिकाणी योग्य नियोजन करुन सापळा रचून आरोपी मोतीलाल फुलेना चौरसिया यास ताब्यात घेऊन अटक केली, आरोपीस पुढील न्यायालयीन कार्यवाहीसाठी मा.न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. शिवाजीनगर पोलीसांनी दिर्घकाळापासुन फरार असलेल्या आरोपीस अटक करुन त्यास न्यायालयीन प्रक्रियेसमोर आणले आहे.

सदरची उल्लेखनिय कामगीरी मा. पोलीस आयुक्त श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त का. व सु श्री. मनोजकुमार शर्मा, मा. अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग श्री. धनंजय कुलकर्णी, पोलीस उप आयुक्त पुर्व परिमंडळ ०६ समीर शेख, सहायक पोलीस आयुक्त देवनार विभाग कलिम शेख, वरिष्ठ पोलीस निरीक्षक धनंजय शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि चौधरी, सपोउपनि खाडे व पोशि बाबर यांनी केली आहे.

***